# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

क्र.1483/शि.वि./2014 दि.15/01/2014.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :– शाळेमध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्याबाबत.**

**संदर्भ** :– 1) पत्र क्र.सा.प्र.वि/1013/एम. दि. 09.01.2014.
2) शासन परिपत्रक क्र.एम व्ही.आर–1213/प्र.क्र.14/परि –2, शिबिर कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर, दि. 20 डिसेंबर 2013.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दि. 3 जानेवारी 2014 ते दि. 17 जानेवरी 2014 या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान सर्व राज्यभर राबविण्याच्या शासनाने निर्णय घेतला आहे. जन सामान्यच्या मनात रस्ता सुरक्षा संदर्भात वर्ष 2014 साठी केंद्र शासनाने रस्ते सुरक्षा अभियान प्रित्यर्थ **When on road always say Pehale Aap** हे घोष वाक्य दिले आहे. या घोष वाक्यानुसार सुयोग्य प्रसिध्दी देण्यासाठी जनजागृती व रस्ता सुरक्षेविषयी गांर्भीय निर्माण करण्यासाठी "रस्ता सुरक्षा अभियानातंर्गत" खालील कार्यक्रमाचे आयोजन शालेय स्तरावर करावे.

1) आपल्या शाळेमध्ये वाहतुकीचे नियम व सुरक्षिततेच्या दृष्टीने चर्चासत्र भरविणे तसेच व्याख्यानमाला व निबंधस्पर्धेचे आयोजन करणे, रस्ता सुरक्षा विषयाच्या पाठयक्रमात समावेश करणे. एन.सी.सी./एन.एस.एस. च्या माध्यमातून रस्ता सुरक्षा अभियान विद्यार्थ्यांमध्ये पोहचविणे
2) शाळामध्ये रस्ता सुरक्षा विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करावी.
3) वकृत्व स्पर्धा, शिबिरे, मेळावे, परिसंवाद यांचे आयोजन करून सुरक्षित वाहन चालविणेबाबत जनजागृती करावी.
4) विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्यास सांगून आपले पालक व मित्रमंडळी यांनासुध्दा वाहतुकीचे नियम पाळण्यास प्रवृत्त करण्यास प्रेरीत करावे.
5) ट्राफीक पार्क येथे शालेय विद्यार्थ्यांना भेट देण्यास्तव सहलीचे आयोजन करावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

**प्रतिलिपी :–**

1) मा. आयुक्त, म.न.पा., नागपूर.
2) मा. अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर.
3) मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर.
4) सहा. आयुक्त, सा.प्र.वि., म.न.पा., नागपूर.